स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २०/०५/२०१८

# इगतपुरी तालुक्यातील नांदगाव सदो शिवारातील खुनाचे गुन्हयाचा उलगडा - नाशिक शहरातील मारेक-यांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने घेतले ताब्यात

---

इगतपुरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५ मे २०१८ रोजी नांदगाव सदो शिवारातील नारायण भागडे यांचे शेतामध्ये एका अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले होते. मयत इसमास कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणावरुन कडप्याचे फरशीचे पट्टीने डोक्यावर मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले होते. सदर घटनेबाबत **इगतपुरी पोलीस ठाणेस I गु.रजि.नंबर ४६/२०१८ भादवि कलम ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.,** व **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी सदर घटनेबाबत दखल घेवुन अज्ञात मारेक-यांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु करून घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तसेच मयत इसमाने परिधान केलेले अंगवस्त्र व त्याचे अंगावरील चिजवस्तुंचे परिक्षण करून स्थागुशाचे पथकास सदर खुनाचा कसोशिने तपास करणेबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मयत इसमाबाबत इगतपुरी पोलीस ठाणेचे नजीकचे पोलीस ठाणे व नाशिक शहरातील पोलीस ठाण्यांमधील बेपत्ता इसमांची माहिती घेण्यास सुरूवात केली, तसेच मयत इसमाचे पेहरावावरून तो नाशिक शहरातीलच असल्याचा अनुमान स्थागुशाचे तपास पथकाने काढला. दरम्यान दिनांक १९/०५/२०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी नाशिक शहरात मयत इसम व अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार मयत इसमाचे वर्णनावरून अंबड परिसरातील एक इसम बेपत्ता असल्याचे समजले, त्यावरून बेपत्ता इसमाचे नातेवाईकांना वरील मयत इसमाचे फोटो दाखविले असता, मयत इसम हा **बाळु अशोक मोरे, रा. अंबडगाव शिवार,** मुळ रा. फुलेनगर, पंचवटी नाशिक असल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत अंबड पोलीस ठाणेस मयताचे आईने तक्रार दिलेवरून मिसिंग दाखल असल्याचे समजले. मयत इसम नामे बाळु अशोक मोरे याचेबाबत खात्री झाल्याने स्थागुशाचे पथकाने त्याचे दैनंदिन कामकाज व राहणीमानाबाबत सविस्तर माहिती घेतली.

तसेच सदर गुन्हयातील मयत इसम हा दिनांक १४ मे २०१८ रोजी अंबड औद्योगिक परिसरात एका लेबर कॉन्ट्रक्टरकडे गेला असल्याचे समजले वरून स्थागुशाचे पथकाने तपास सुरु केला, दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक यांनी मिळविलेल्या गुप्त माहितीनुसार मयत इसम हा त्रिमुर्ती चौक परिसरातील ०३ युवकांबरोबर रात्रीचे सुमारास कोठेतरी गेला असल्याचे खात्रीशीर समजलेवरून स्थागुशाचे पथकाने संशयीत इसम नामे **१) अजिंक्य भागवत पाटील,** वय २३, रा. शिवशक्ती चौक,सिडको, नाशिक, **२) पंकज रामदास देशमुख,** वय २३, रा.त्रिमुर्ती चौक, सिडको नाशिक, **३) योगेश पोपट आहिरे,** वय २३, रा. त्रिमुर्ती चौक, सिडको, नाशिक यांना त्रिमुर्ती चौक परिसरातुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना विश्वासात घेवुन युक्ती प्रयुक्ती तसेच कला कौशल्य वापरुन तपास केला असता, त्यांनी दिनांक १४ मे २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास मयत बाळु अशोक मोरे यास अंबड शिवारातुन लान्सर कार मध्ये घेवुन जावुन इगतपुरी शिवारातील नांदगाव सदो गावचे रोडलगत एका शेतामध्ये त्याचे डोक्यावर फरशीचे कडाप्याने जबर मारहाण करू जिवे ठार मारले असल्याची कबुली दिली आहे.

वरील ताब्यात घेतलेला आरोपी नामे अजिंक्य भागवत पाटील याचे वडील भागवत पाटील यांचेकडे काही दिवसांपुर्वी लेबर कॉन्ट्रक्ट असतांना मयताचा मित्र व तो नेहमी कामानिमित्त येत होते, दरम्यान मयत बाळु अशोक मोरे हा त्यांचेकडे नेहमी पैशांची मागणी करत असे, दिनांक १४ मे २०१८ रोजी मयत बाळु मोरे हा भागवत पाटील यांचेकडे पैशांची मागणी करण्यासाठी गेला होता, तेव्हा त्यांचा मुलगा नामे अजिंक्य पाटील याने माझे वडील बाहेर गेले आहे, तु माझेकडे पैसे मागु नको असे बोलुन त्यांचेत वाद झाले. त्यानंतर अजिंक्य पाटील याने त्याचे वरील मित्र पंकज देशमुख व योगेश आहिरे यांचेसह मयत बाळु मोरे यास त्यांचे लान्सर कारमध्ये घेवुन जावुन त्यास दारू पाजुन इगतपुरीकडे घेवुन गेले व नांदगाव सदो शिवारातील एका शेतामध्ये त्याचे डोक्यावर कडप्प्याचे फरशीने मारहाण करून जिवे ठार मारले आहे. सदर आरोपीतांनी वरील गुन्हयात वापरलेली लान्सर कार जप्त करण्यात आली असुन वरील तीनही आरोपीतांना इगतपुरी पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

वरील गुन्हयातील मयत नामे हा यातील आरोपी अजिंक्य पाटील याचे वडीलांकडे नेहमी पैशांची मागणी करायचा तसेच त्याने यापुर्वीही त्यांचेवर दमदाटी करून पैसे उकळण्याचा प्रयत्न केल्याचा राग मनात धरून सदर खुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच मयत बाळु मोरे याचेवर पंचवटी व वणी पोलीस ठाणेस गंभीर दुखापतीचे गुन्हे असल्याचेही समजले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो**, यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थागुशाचे **पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. अशोक करपे**, सपोनि आषिश आडसुळ, सपोउनि नवनाथ गुरूळे, सपोउनि रविंद्र शिलावट, पोहवा शिवाजी जुंदरे, बंडु ठाकरे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ यांचे पथकाने अत्यंत चिकाटी व कौशल्यपुर्ण तपास करून सदर अनोळखी मयताची ओळख पटवुन सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.